॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

* सुविचार *

आयुष्य हे सुंदर आहे, फक्त जगण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असावा.

▪ अहिल्यानगर ▪ शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ६९ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


# जिल्ह्यात FFS डिजिटल खत वितरण प्रणाली प्रभावीपणे राबवा

## जिल्हाधिकारी पंकज आशिया यांचे निर्देश । ६५ हजार मेट्रिक टनांहून अधिक खतसाठा उपलब्ध

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

केंद्र शासनाच्या रसायन व खत मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या "Framework for Fertilizer Sale (FFS)' डिजिटल प्रणालीची जिल्ह्यात प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

FFS प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची विशेष आढावा बैठक झाली. यावेळी ऋऋड पची कार्यपद्धती, खत नियोजन तसेच शेतकऱ्यांसाठी सुलभ, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित खत वितरण व्यवस्थेबाबत चर्चा करण्यात आली.



या प्रणालीद्वारे पिकाची गरज, सातबारा व पीक नोंदीनुसार क्षेत्रफळाच्या आधारे युरिया, डीएपी, एनपीकेएस आदी खतांचे अचूक प्रमाण सुचविले जाणार आहे. त्यामुळे अनावश्यक खतखरेदी टाळून उत्पादन खर्चात बचत होण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांना वाजवी व शासकीय दरात आवश्यक तेवढीच खते खरेदी करता येणार आहेत.

FFS ॲपद्वारे शेतकऱ्यांना तालुक्यातील अधिकृत कृषी सेवा केंद्रांवरील उपलब्ध खतसाठा (लाइव्ह इन्व्हेंटरी) पाहून पसंतीचे केंद्र निवडता येणार आहे. पवर बुकिंग केल्यानंतर मिळणारा डिजिटल QR पास ई-पॉस यंत्रावर स्कॅन करून शेतकरी अथवा अधिकृत प्रतिनिधी तीन दिवसांच्या आत खत खरेदी करू शकणार आहे.

दरम्यान, जिल्ह्यात ६५ हजार मेट्रिक टनांपेक्षा अधिक खतसाठा उपलब्ध असून, खतटंचाईची शक्यता नसल्याचे बैठकीत सांगण्यात आले. जिल्ह्यातील खत विक्री परवान्यांचे अद्ययावतीकरण पूर्ण झाले असून, उर्वरित प्रकरणांतील तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गोदामातील प्रत्यक्ष साठा आणि ई-पॉसवरील डिजिटल साठा नियमितपणे अद्ययावत ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले.

बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, विविध रासायनिक खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा संघटनेचे प्रतिनिधी छबुराव हराळ यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### FFS ॲपचा वापर करण्याचे आवाहन

▪ शेतकऱ्यांनी आधुनिक व पारदर्शक खत वितरण व्यवस्थेसाठी ऋऋड पचा जास्तीत जास्त वापर करून आवश्यक खतांचे आगाऊ आरक्षण करावे. त्यामुळे ऐन हंगामात होणारी गैरसोय टाळता येईल, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### सेटलमेंट

समाजसेवा व सेटलमेंट
एकमेकांचे भावबंध
तू मार मी रडतो
हा मिळून झाला छंद
वर्षानुवर्षे भ्रष्टाचारमुक्तीचे
किती गोंडस मिशन?
उघडा डोळे बघा नीट
टेबलानुसार इथे कमिशन!

## SPOT NEWS

### साखरेचा गोडवा महागला

**● मुंबई –** गेल्या काही महिन्यांपासून जीवनापयोगी आणि त्यातही खाद्य पदार्थांशी संबंधित वस्तूंमध्ये सातत्याने वाढ होताना पाहायला मिळत आहे. डाळी, भाज्या, फळे या वस्तूंमध्ये होणा-या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे बजेट आधीच कोसळले आहे. त्यातच आता साखरेच्या दरातही मोठी वाढ झाल्याने चहातील गोडवा सुद्धा महागला आहे. साखरेच्या वाढत्या दरामुळे आता मिठाईच्या दरांमध्ये वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. ऐन सणासुदीच्या काळात साखरेसोबतच मिठाईचे दर वाढत असल्याने सर्वसामान्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. आधीच महागाईने कंबरडे मोडले असताना आता सणासुदीच्या काळात गोड पदार्थ बनवण्यासाठी लागणारी साखरही महाग होत असल्याने याबाबत सर्वसामान्यांची चिंता वाढली आहे. साखरेच्या दराने मोठी उच्चांकी गाठली असून, साखरेचे प्रति क्विंटल दर हे ७ हजार ५०० रुपयांवर पोहोचले आहेत. त्यामुळे किरकोळ दरात सुद्धा मोठी वाढ झाली आहे. . साखरेची ही आत्तापर्यंतची इतिहासातील सर्वात मोठी वाढ आहे. त्यामुळे साखरेचा भाव वाढल्याने सरकारने लवकरात लवकर यावर काहीतरी तोडगा काढावा आणि साखरेचा दर पुन्हा एकदा सामान्यपातळीवर येण्यासाठी निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. वाशिम जिल्ह्यात किरकोळ बाजारात साखरेचे दर ८० रुपयांवर गेले आहेत. तर, मुंबईतही ७० ते ७५ रुपयांदरम्यान साखर विक्री होत आहे.

# राज्यात सुट्या खाद्यतेलांच्या विक्रीवर बंदी; तुकाराम मुंढे यांची घोषणा

**● मुंबई । वीरभूमी –**

राज्यात आता सुटे खाद्यतेल विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. सुट्या तेलाची विक्री करणा-या घाऊक अथवा किरकोळ विक्रेत्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची घोषणा अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केली आहे. कायद्याचे उल्लंघन करणा-या व्यक्तीला ७ वर्षांपासून आजन्म कारावासाची शिक्षा होऊ शकेल. ३ लाखांपासून ते १० लाख रूपयांपर्यंतचा दंड देखील यासाठी ठोठावण्यात येणार आहे. नागरिकांनी देखील सुटे खाद्यतेल खरेदी करू नये असे आवाहन तुकाराम मुंढे यांनी केले आहे.

तुकाराम मुंढे यांनी पत्रकारपरिषदेत आज याची घोषणा केली. २०११ ला आपले एफएसएसआयचे कायदे आले त्यानुसार परवाना असणे व नियमन पाळणे अपेक्षित असल्याचे सांगून तुकाराम मुंढे म्हणाले, आपण याबाबत तपासणी केली. त्यात बारा प्रमुख त्रुटी आढळल्या. खाद्यतेल निर्मात्या अनेक उत्पादकांकडे लायसन्स, रजिस्ट्रेशन नाही. खादयतेलात मोठया प्रमाणात भेसळ आढळली. ॲसिडिक, औद्योगिक ट्रान्स फॅट आढळले. तेलाचा खरा स्त्रोत तसेच उत्पादन दिनांक लपविण्यात येते. मुदत संपलेले तेल पुन्हा पॅक करून विकण्याचा प्रकार घडतो. ॲगमार्क शिवाय तेल विक्री केले जाते. सुट्या प्रकारात खाद्यतेल विक्री केली जाते. फूड ग्रेड मटेरियल नसलेल्या वेष्टनाचा वापर केला जातो. घातक खनिज तेलाची वाहतूक झालेल्या टँकरमधूनच या खादयतेलाची वाहतूक करण्यात येते. गंजलेल्या कॅनमध्येच पुन्हा तेलाचे पॅकिंग करण्यात येते. २०२५-२६ मध्ये आपण १२४७ खाद्यतेल नमुने तपासले त्यापैकी स्टँडर्ड ११४२ आढळले, सबस्टँडर्ड ७७ केसेस झाल्या तर १३ अनसेफ सापडले. त्यामुळे आता आपण खाद्यतेलाबद्दल विशेष आदेश काढले असल्याचे तुकाराम मुंढे म्हणाले.

# ताजनापूर टप्पा २ योजनेतून आजपासून शेती सिंचनासाठी पाणी

## ठाकूर निमगाव-माळेगाव ने भागालाही आठ दिवसांत पाणी

**● शेवगाव । वीरभूमी –**

ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक २ च्या लाभक्षेत्रात शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ पासून सिंचनासाठी पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पावसाचे प्रमाण कमी असल्याने निर्माण झालेल्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून सिंचनासाठी पाणी सोडण्याची मागणी होत होती. त्यानुसार जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आल्याची माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली.



अहिल्यानगर मध्यम प्रकल्प विभागांतर्गत ताजनापूर उपसा सिंचन योजनेत समाविष्ट गावांना मुख्य वितरणकुंड क्रमांक २ व ३ मधून संबंधित गावांच्या नदीपात्रात पाणी सोडण्यात येणार आहे. बंधारे व आऊटलेटद्वारे शेतीसाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

दरम्यान, ठाकूर निमगाव व माळेगाव ने परिसरातील शेतीक्षेत्र उंचावर असल्याने या भागासाठी यांत्रिकी विभागामार्फत पॅनलची उभारणी व पंपाची जोडणी करण्यात येणार आहे. हे काम पूर्ण करून आठ दिवसांत या भागातही सिंचनासाठी पाणी सोडण्यात येईल, असे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले.

पावसाअभावी अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना या पाणीपुरवठ्यामुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

# 'एक पेड माँ के नाम' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## CQAV येथे वृक्षारोपण संपन्न । अधिकारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पर्यावरण संवर्धनासोबतच मातृत्व आणि मातृभूमीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेतून कंट्रोलरेट ऑफ क्वालिटी ॲश्युरन्स व्हेईकल्स (CQAV) येथे 'एक पेड माँ के नाम' या विशेष वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. CQAV चे ब्रिगेडियर राजीव चावला आणि विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण अमोल जाधव यांच्या संयुक्त पुढाकारातून बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पद्मश्री पोपटराव पवार यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते तसेच उपस्थित मान्यवरांच्या सहभागातून वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर अधिकारी, विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी डॉ. सर्जेराव निमसे, माजी उपकुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डॉ. विलास कचरे, उपकुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, मुम्मका सुदर्शन, पोलिस अधीक्षक, मुकुंद चिलवंत, जिल्हा माहिती अधिकारी, विकास पालवे, वरिष्ठ अधीक्षक, पोस्टल सर्व्हिसेस, विवेक मुळीक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रमेश कासार, प्रमोद सटाले, सहाय्यक संचालक, वित्त सेवा, सोनल केसरकर, सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात आर्मी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने वृक्षारोपण करत पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याचा संदेश दिला.

'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाची संकल्पना केवळ वृक्ष लावण्यापुरती मर्यादित न ठेवता, लावलेल्या प्रत्येक रोपाचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. वृक्ष हे पर्यावरणाचे रक्षण करण्याबरोबरच भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि निरोगी भविष्याची गुंतवणूक असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्था-संघटनेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपल्या आईच्या सन्मानार्थ तसेच मातृभूमीच्या ऋणातून एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करावे, हा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन CQ-V चे श्री. तेली सर यांनी अभ्यासपूर्ण व प्रभावीपणे केले. उपस्थित मान्यवर, अधिकारी, विद्यार्थी आणि सहभागी नागरिकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

पर्यावरण संवर्धनाला भावनिक आणि सामाजिक बांधिलकीची जोड देणारा 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम उपस्थितांच्या सहभागामुळे संस्मरणीय ठरला.

# पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा गुंतवणूक परिषदेचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यात उद्योग, व्यवसाय आणि गुंतवणुकीला चालना देऊन रोजगारनिर्मितीच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने "District Investment Summit 2026' (जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६) चे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृह, दुसरा मजला, अहिल्यानगर येथे होणार आहे.



या महत्त्वपूर्ण परिषदेचे अध्यक्षस्थान जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे) तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील भूषविणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मैत्रीचे विशेष आयुक्त वैभव वाघमारे तसेच जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया (भा.प्र.से.) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

जिल्ह्यात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित झाल्यास नवीन उद्योगांची स्थापना, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, पूरक व्यवसायांना चालना, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ आणि जिल्ह्याच्या एकूण आर्थिक विकासाला गती मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे "District Investment Summit 2026' ही परिषद अहिल्यानगरच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

जिल्ह्यातील उद्योग व गुंतवणुकीच्या संधींचा व्यापक प्रसार करून अधिकाधिक उद्योजक व गुंतवणूकदारांना जिल्ह्याकडे आकर्षित करण्यासाठी या परिषदेचा उपयोग होणार आहे. उद्योग क्षेत्रातील सर्व संबंधितांनी या परिषदेला उपस्थित राहून उपलब्ध संधींची माहिती घ्यावी आणि जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगरचे उपआयुक्त दीपक शिवदास आणि उद्योग विभाग, नाशिक विभागाच्या सहआयुक्त वृषाली सोने यांनी केले आहे.

# पदरचे पैसे खर्च करून हनुमंताचे मंदिर बांधले

## पारनेरच्या शिलालेखातून १८४५ च्या इतिहासाची साक्ष

■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** पारनेर शहराच्या पश्चिम वेशीजवळील हनुमान मंदिराच्या प्रवेशद्वारावर कोरलेला शिलालेख तब्बल पावणेदोनशे वर्षांपूर्वीच्या धार्मिक श्रद्धा, दानपरंपरा आणि स्थानिक मंदिर स्थापत्याची महत्त्वपूर्ण ऐतिहासिक साक्ष देत आहे. अवजी (आवजी) वलद खंडुजी पाटील यांनी आपल्या पदरच्या द्रव्याने हनुमंताचे देऊळ व शिखर उभारल्याची नोंद या शिलालेखात करण्यात आली आहे. शालिवाहन शक १७६७ अर्थात इ.स. १८४५ मधील हा शिलालेख पारनेरच्या धार्मिक आणि सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पारनेर येथील पश्चिम वेशीजवळ असलेल्या मारुती मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला हा शिलालेख कोरलेला आहे. उठाव स्वरूपातील हा लेख देवनागरी लिपीत मराठी भाषेत असून एकूण सात ओळींचा आहे. शिळेवर मोठ्या प्रमाणात रंगरंगोटी झाल्यामुळे मजकूर स्पष्टपणे दिसत नाही; मात्र छाप घेतल्यानंतर थोड्या प्रयत्नाने त्याचे वाचन करता येते.

**शिलालेखातील मूळ वाचन**

**१.श्री गणेशायनम ।। श्री पाराशर क्षेत्री पुर्व द्वारी रुद्रा**

**२.वतार हनुमंत ।। त्याचे केले देउळ शीद्धी शीखर श्री**

**३.राम अर्पिता ।। त्याचे चरणी अवजी व।। खंडुजी**

**४.प्र।। अवंठी(टी) चतुर्थ भागार्थु अ(प)ल्या पदराचे द्रव्याने**

**५.केले सके सत्राशे सदुसष्टात ।। मार्गे श्वर शुद्ध त्रयो**

**६.देशी गुरुवार माध्यान अभीजात ।। शुभ मंगळ दये कसबा**

**७।। शुभं भवतु ।। चास्य तीन करनार**

शिलालेखाची सुरुवात श्री गणेशाय नमः या मंगलाचरणाने होते. पुढे पाराशर क्षेत्राच्या पूर्वद्वाराजवळ रुद्रावतार हनुमंताचे देऊळ व शिखर बांधल्याचा उल्लेख आहे. हे धार्मिक कार्य श्रीरामाला अर्पण करण्यात आल्याचेही लेखातून दिसते. विशेष म्हणजे, मंदिरनिर्मितीसाठी अवजी वलद खंडुजी यांनी आपल्या स्वतःच्या पदरच्या द्रव्याने म्हणजे स्वखर्चाने योगदान दिल्याची स्पष्ट नोंद या शिलालेखात आढळते.

### शके १७६७ मधील मंदिरनिर्मितीची नोंद

शिलालेखात शालिवाहन शक १७६७, मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी, गुरुवार आणि अभिजित मुहूर्त असा कालोल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे मंदिरनिर्मिती अथवा त्यासंबंधित धार्मिक कार्याचा काल निश्चित करण्यासाठी हा लेख महत्त्वाचा ठरतो. दिलेल्या कालगणनेनुसार हा काळ इ.स. १८४५ मधील असून, धार्मिक वास्तू उभारताना तिथी, वार आणि शुभ मुहूर्त यांना तत्कालीन समाजात असलेले महत्त्व यातून अधोरेखित होते.

या शिलालेखामुळे केवळ मंदिराची निर्मिती कधी झाली याची माहिती मिळत नाही, तर गावातील व्यक्ती स्वतःच्या आर्थिक साधनातून धार्मिक वास्तू उभारण्यासाठी पुढाकार घेत असल्याचेही स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन स्थानिक दानपरंपरा आणि धार्मिक जीवनाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांसाठी हा लेख महत्त्वाचा प्राथमिक पुरावा आहे.

### श्रीराम-हनुमान भक्तीची परंपरा

हनुमानाला शिलालेखात रुद्रावतार म्हणून संबोधण्यात आले आहे. त्याचे देऊळ व शिखर बांधून ते श्रीरामाला अर्पण केल्याचा उल्लेख आहे. यावरून पारनेर परिसरात त्या काळात श्रीराम-हनुमान भक्तीची दृढ परंपरा असल्याचे दिसून येते. मंदिराची उभारणी ही केवळ धार्मिक वास्तू निर्माण करण्याची बाब नसून भक्ती, दान आणि सामाजिक सहभाग यांचा संगम असल्याचे शिलालेखातून जाणवते.

### स्थानिक मंदिर स्थापत्याचा महत्त्वाचा पुरावा

शिलालेखात देऊळ आणि शिखर या वास्तूघटकांचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे इ.स. १८४५ च्या आसपासच्या पारनेर परिसरातील स्थानिक मंदिर स्थापत्याचा अभ्यास करण्यासाठीही हा लेख उपयुक्त ठरतो. पाराशर क्षेत्राच्या द्वाराजवळ मंदिराची उभारणी करण्यात आल्याने त्या काळातील धार्मिक परिसराची रचना आणि त्यातील मंदिरांचे स्थान याबाबतही संशोधनाची दिशा मिळते.

भाषिकदृष्ट्याही हा लेख महत्त्वाचा आहे. देऊळ, चरणी, पदराचे द्रव्य, केले यांसारखे शब्दप्रयोग तत्कालीन मराठी भाषेचे स्वरूप आणि स्थानिक लेखनपरंपरेवर प्रकाश टाकतात. त्यामुळे हा शिलालेख धार्मिक इतिहासाबरोबरच मराठी भाषा, सामाजिक इतिहास, स्थानिक अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक परंपरांच्या अभ्यासासाठीही महत्त्वपूर्ण ठरतो.



शिलालेखाच्या अखेरीस शुभं भवतु असा मंगलाशय व्यक्त करण्यात आला आहे. मंदिरनिर्मितीचे कार्य पूर्ण झाल्यानंतर सर्वांचे कल्याण आणि मंगल व्हावे, अशी तत्कालीन धार्मिक भावना यातून व्यक्त होत असल्याचे दिसते.

### इतिहासाचा जिवंत दस्तऐवज

पारनेरच्या या हनुमान मंदिरावरील शिलालेखात एका भक्ताने स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करून धार्मिक



वास्तू उभारल्याची स्मृती दगडावर कायमस्वरूपी जतन केली आहे. त्यामुळे हा लेख केवळ मंदिराच्या उभारणीची नोंद नसून, इ.स. १८४५ च्या आसपासचे स्थानिक समाजजीवन, धार्मिक श्रद्धा, दानशूरता, मंदिर स्थापत्य आणि तत्कालीन मराठी भाषेचे स्वरूप यांचा एकत्रित ऐतिहासिक दस्तऐवज ठरतो.

या शिलालेखाचे वाचन, संशोधन व माहिती पुणे येथील शिलालेखतज्ज्ञ अनिल दुधाणे व डॉ. शैलेंद्र भांडारे यांनी केले आहे.

# अतिवृष्टी व पुरामुळे खचलेल्या आणि बुजलेल्या सर्वच नुकसान ग्रस्त विहिरींच्या प्रस्तावांना मंजुरी द्या : आ. आशुतोष काळे

● **कोपरगाव । वीरभूमी–** मतदारसंघात गेल्यावर्षी मुसळधार पाऊस व अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे मतदारसंघात जवळपास २४२ सिंचन विहिरी खचल्या आणि बुजल्या आहेत. या विहिरी शासनाच्या माध्यमातून दुरुस्त करण्यात याव्या यासाठी जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून शासन दरबारी २४२ विहिरींच्या नुकसानीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. परंतु यापैकी १३२ प्रस्तावांनाच मंजुरी मिळाली असून उर्वरित ११० प्रस्तावांना देखील मंजुरी द्यावी अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी उपजिल्हाधिकारी वर्षा पवार यांच्याकडे केली आहे.

मागील वर्षी मुसळधार पाऊस व पुरामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या विहिरी खचल्या आणि बुजल्या होत्या. या विहिरींचे अतोनात नुकसान झाल्यामुळे पिकांसाठी



सिंचनाचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना शेतात पिके करता आले नसल्याने अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या परिस्थितीची दखल घेऊन आमदार आशुतोष काळे यांनी महसूल विभागामार्फत बाधित विहिरींचे प्रत्यक्ष पंचनामे आणि सर्वेक्षण पूर्ण करून घेतले होते. या सर्वेक्षणाच्या आधारे नुकसान भरपाई मिळण्यासाठी २४२ प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्यात आले होते. यापैकी १३२ प्रस्तावांनाच मंजुरी देण्यात आली. ११० प्रस्ताव विनाकारण नामंजूर करण्यात आल्यामुळे आ.आशुतोष काळे यांनी अहिल्यानगर उपजिल्हाधिकारी वर्षा पवार यांच्याशी भ्रमणध्वनी वरून चर्चा केली.

शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असून महसूल विभागाने स्वतः स्थळपाहणी करून प्रस्ताव तयार केले आहेत. एकाच प्रकारच्या आपत्तीत काही विहिरींचे प्रस्ताव मंजूर करणे आणि काही अमान्य करणे हे योग्य नाही. त्यामुळे कोणताही तांत्रिक पेच निर्माण न करता अमान्य केलेले उर्वरित ११० विहिरींच्या नुकसानग्रस्त प्रस्तावांना देखील प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी अशी मागणी आ.आशुतोष काळे यांनी अहिल्यानगर उपजिल्हाधिकारी वर्षा पवार यांच्याकडे केली आहे.

# प्रतिमा कुलकर्णी यांना मधुरजगचा पुरस्कार

## एकल महिलांच्या पुनर्वसनासाठीच्या कार्याची दखल । ५० हजार रुपयांनी सन्मान

● **अकोले । वीरभूमी–** अकोले तालुक्यातील एकल महिलांच्या प्रश्नांवर काम करून त्यांच्या पुनर्वसनासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या प्रतिमा कुलकर्णी यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत मधुरजग फाउंडेशनतर्फे ५० हजार रुपयांचा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

रविवार, १६ ऑगस्ट २०२६ रोजी गिरीवन रिसॉर्ट, कोलवण, मुळशी, पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अकोले तालुक्यातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित तसेच विविध कारणांमुळे एकट्या जीवन जगणाऱ्या महिलांना सन्मानाने जगण्यासाठी आधार देण्याचे काम कुलकर्णी यांच्या माध्यमातून सुरू आहे. केवळ मदत न करता त्यांना स्वावलंबी, आत्मनिर्भर करून समाजाच्या मुख्य प्रवाहात



सन्मानाने उभे करण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यातून केला जात आहे.

कार्यक्रमाला ‘मिळून साऱ्याजणी’च्या संपादिका डॉ. गीताली वि. मं. तसेच लेखक, अभ्यासक, राजकीय विश्लेषक व अभिनेते प्रा. अजित अभ्यंकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी सामाजिक संवेदनशीलता, स्त्रियांचे प्रश्न आणि वंचित घटकांसाठी सुरू असलेल्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

मधुरजग फाउंडेशनचे संस्थापक जगदीशजी काबरे यांनी अकोले तालुक्यातील एकल महिलांसाठी सुरू असलेल्या कार्याचे कौतुक केले. महिलांच्या वेदना समजून घेत त्यांना सहानुभूतीपुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष मदत, पुनर्वसन आणि स्वावलंबनाच्या दिशेने नेण्यासाठी कुलकर्णी यांनी केलेल्या प्रयत्नांचा त्यांनी गौरव केला.

या पुरस्काराने मला आणि कुटुंबीयांना आनंद झाला आहे. आपण करत असलेल्या कामाची दखल समाज घेतो, याची प्रचिती अशा प्रसंगातून मिळते. पुरस्कार न मिळाल्याने काम थांबत नाही; मात्र पुरस्कार मिळाल्यास काम करण्यासाठी जोम निश्चितच वाढतो, असे प्रतिमा कुलकर्णी यांनी मनोगतात सांगितले.

या प्रसंगी अन्वर राजन, दिग्दर्शक सुनील सुकथनकर, दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ, हेरंब कुलकर्णी, सिस्कॉमचे राजेंद्र धारणकर, सचिन गुरव, संजय पुजारी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना साळुंके यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन ब्राईट फाउंडेशनचे कुमार नागे यांनी केले.

# समता स्कूलमध्ये योगासन स्पर्धेत युवा कर्तृत्वाने गाठली नवी उंची

● **कोपरगाव । वीरभूमी –** समता इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७ वी जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप स्पर्धा २०२६-२७ उत्साह, शिस्त आणि क्रीडाविष्काराच्या वातावरणात १६ व १७ ऑगस्ट २०२६ रोजी समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या स्पर्धेच्या निमित्ताने जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या युवा योगासनपटूंनी विलक्षण लवचिकता, शारीरिक सामर्थ्य, अचूक संतुलन, मानसिक एकाग्रता आणि आत्मविश्वासाचे प्रभावी दर्शन घडविले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला समता इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य समीर अत्तार यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. शिर्डी मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे तसेच मालपाणी उद्योग समूह अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. पारितोषिक वितरणासाठी शिर्डी नगर परिषदेचे नगरसेवक अमित शेळके, योग प्रशिक्षक उत्तमभाई शहा, अभिजीत शहा, सतीश गुजराथी, महेश थोरात, आदिनाथ ढाकणे, समता पतसंस्थेचे संचालक संदीप कोयटे, समता स्कूलच्या कार्यकारी विश्वस्त सौ.स्वाती कोयटे उपस्थित होते.

दरम्यान, समता इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात दोन दिवस रंगलेल्या या योगासन स्पर्धेमुळे परिसरात उत्साहाचे आणि क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक योगासनासोबतच आर्टिस्टिक योगासन सिंगल, आर्टिस्टिक योगासन पेअर, रिदमिक योगासन पेअर, ट्रेडिशनल ग्रुप आणि आर्टिस्टिक ग्रुप अशा विविध प्रकारांत खेळाडूंनी आपले कौशल्य सादर केले. आसनातील अचूकता, शरीराचा समतोल, लवचिकता, तालबद्धता आणि सादरीकरणातील सफाई यांचा सुरेख मिलाफ प्रत्येक सादरीकरणातून जाणवत होता.

स्पर्धेच्या अंतिम निकालात संगमनेर तालुक्याने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले. अहिल्यानगर तालुक्याने द्वितीय, तर अकोले तालुक्याने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या संघांसह सहभागी सर्व खेळाडूंचे मान्यवरांनी अभिनंदन केले.

प्रसंगी संजय मालपाणी म्हणाले की, योग ही केवळ शरीर तंदुरुस्तीची साधना नसून मनाला स्थैर्य, विचारांना सकारात्मक दिशा आणि जीवनाला शिस्त देणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांनी योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा. समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना योग आणि क्रीडा क्षेत्रात मिळणाऱ्या संधी कौतुकास्पद असून, अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाला निश्चितच आकार मिळतो. तसेच त्यांनी समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये योग व क्रीडा क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाचे कौतुक करत त्यांनी



विद्यार्थ्यांच्या मेहनतीला दाद दिली.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याचे सांगत शिक्षणासोबत योग आणि क्रीडेलाही जीवनाचा भाग बनविण्याचे आवाहन केले. योगामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संयम, एकाग्रता आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत क्रीडा क्षेत्रातही सातत्याने सहभाग घेऊन आपले व्यक्तिमत्त्व घडवावे, असे त्यांनी सांगितले.

स्कूलच्या कार्यकारी विश्वस्त सौ. स्वाती कोयटे यांनी योगामुळे शरीर सुदृढ, मन स्थिर आणि व्यक्तिमत्त्व आत्मविश्वासपूर्ण बनत असल्याचे सांगत विजयापेक्षा सातत्य, जिद्द आणि प्रयत्न अधिक महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले.

योगासनाच्या या क्रीडामय सोहळ्याला सांस्कृतिक रंगतही लाभली. आदित्य सूर्यवंशी व गार्गी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्याविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षिका कविता पाटील, विभावरी नगरकर, शुभम औताडे आदींसह समता इंटरनॅशनल स्कूलच्या सर्व क्रीडा शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्वेताली सदाफळ यांनी केले. उपप्राचार्य मोहिनी जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## पारनेर शहरात ‘हर घर तिरंगा’ व स्वच्छता पंधरवड्यानिमित्त जनजागृती रॅली

**● पारनेर । वीरभूमी–**

राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) आणि राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) यांच्या संयुक्त विद्यमाने ‘हर घर तिरंगा’ आणि ‘स्वच्छता पंधरवडा २०२६’ या उपक्रमांच्या जनजागृतीसाठी पारनेर शहरातून रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये रा.से.यो. स्वयंसेवक तसेच एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी नागरिकांना दोन्ही उपक्रमांचे महत्त्व सांगत जनजागृती केली. देशभक्तीपर आणि स्वच्छतेविषयक घोषणांना नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी ‘हर घर तिरंगा’ उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करत देशप्रेम व देशसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. स्वच्छता पंधरवड्याबाबत बोलताना ते म्हणाले, स्वच्छता ही केवळ पंधरवड्यापुरती मर्यादित न राहता आपल्या आणि परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन सवयीचा भाग झाली पाहिजे. तरच आपले आरोग्य अबाधित राहील. महात्मा गांधी, संत गाडगे बाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी पाहिलेले स्वच्छ भारताचे स्वप्न साकारण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. स्वच्छता पंधरवड्यांतर्गत महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाच्या वतीने पारनेर बसस्थानकाची स्वच्छता, महाविद्यालय परिसराची स्वच्छता तसेच पारनेर शहरातील नागरिकांच्या घरोघरी जाऊन स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. हरेश शेळके, लेफ्टनंट भरत डगळे, कार्यालयीन अधीक्षक बाळासाहेब गिरी, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रकाश गावित, प्रा. नितीन निपुंगे, डॉ. माया लहारे, सागर लोंढे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पारनेरात ‘दहा कोटी नशामुक्त महाअभियाना’त महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**● पारनेर । वीरभूमी–**

नागपंचमीच्या पवित्र सणाचे औचित्य साधून पारनेर शहरात ‘शेतकरी महिला ग्रुप’ आणि ‘प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटर’ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘दहा कोटी नशामुक्त महाअभियान’ उत्साहात राबविण्यात आले. ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमातून व्यसनमुक्तीचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक प्रतिज्ञा व ध्यानाने झाली. व्यसनांमुळे व्यक्तीबरोबरच कुटुंब आणि पुढील पिढ्यांवरही विपरीत परिणाम होतो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या घरापासून आणि परिसरापासून नशामुक्तीचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. पारनेरमधील शेतकरी महिला ग्रुपच्या सदस्यांनी अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेत सामाजिक बांधिलकी जपली. नागपंचमीचा सण साजरा करतानाच व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्याचा उपक्रम महिलांनी राबविला. आपल्या गावात आणि परिसरात व्यसनमुक्तीचे प्रबोधन करण्याचा निर्धार उपस्थित महिलांनी व्यक्त केला. या उपक्रमाला हिराबाई मगर, योग शिक्षिका मिरा पुजारी, अरुणा औटी, उज्ज्वला औटी, अंजली ठुबे, वैष्णवी लटाबले, मनिषा मगर, जया औटी, नेहा औटी, सुप्रिया मगर, वैशाली औटी, गायत्री मगर, रंजना लोंढे, शारदा मगर, रोहिणी औटी, रूपाली औटी, कविता मगर, सुषमा औटी आणि पौर्णिमा औटी यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. स्नेहालय संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांनीही उपस्थित राहून अभियानाला पाठिंबा दिला.

# रामगिरी बाबा टेकडीच्या उत्खननाविरोधात जनआंदोलन

**‘विकास नव्हे, हा तर विध्वंस’ म्हणत नागरिक आक्रमक । टेकडी बचाव कृती समितीची भूमिका**

**■ अनिल खाटेर**

**● पाथर्डी । वीरभूमी –**



शहराच्या मध्यवर्ती भागातील रामगिरी बाबा टेकडीच्या नियमबाह्य उत्खननावरून पालिका प्रशासनाच्या कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. जागरूक नागरिक, विविध संस्था व संघटनांच्या सहभागातून राजकारणविरहित जनआंदोलनाची सुरुवात झाली असून, ‘विकास नव्हे, हा तर विध्वंस...’ या शीर्षकाचे प्रसिद्धीपत्रक शहरभर वितरित करण्यात आले आहे. या परिसरात लावण्यात आलेले जनजागृती फलकही तातडीने हटविण्यात आल्याची माहिती आहे.

शहराच्या मध्यभागी सुमारे २५ हजार चौरस मीटर क्षेत्रफळाची उंच टेकडी असून, मध्यभागी ग्रामदैवत रामगिरी बाबांची समाधी आहे. पूर्वी टेकडीवर मोठ्या प्रमाणात झाडी होती. नैसर्गिक मुरमाचा डोंगर असल्याने पावसाचे पाणी साठवून ठेवण्याची क्षमता या भागात होती. त्यामुळे शहरातील विविध आड व हातपंपांना पाणी उपलब्ध होत असे.

नळ योजनेच्या पाण्याच्या टाक्या उभारताना टेकडीच्या काही भागाचे उत्खनन झाले. त्यानंतर खुले नाट्यगृह, उद्यान तसेच पूर्व व उत्तर बाजूच्या नागरी वसाहतींसाठीही टेकडीचा मोठा भाग खोदण्यात आला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना निवासी भूखंड देताना टेकडीचा काही भाग वापरण्यात आला. गेल्या ३०–४० वर्षांत झालेल्या अतिक्रमणांमुळे टेकडीचे मोठ्या प्रमाणात विद्रूपीकरण झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

टेकडीवर सुमारे २० लाख लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या असून, विविध विकासकामांचा राडारोडाही तेथे पडलेला आहे. अलीकडे टेकडीच्या पायथ्याशी खोदकाम करून मुरमाची विल्हेवाट लावण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनटक्के यांनी यापूर्वी केला होता. या प्रश्नावर त्यांनी आंदोलनेही केली होती.

शहरातील ज्येष्ठ पर्यावरणवादी कार्यकर्ते व माजी नगरसेवक डॉ. दीपक देशमुख यांनी प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन नागरिकांशी संवाद साधत जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनात कोणत्याही राजकीय पक्षाचे बॅनर नसून पालिका प्रशासनाची कथित मनमानी, विकासकामांतील गैरप्रकार, वृक्षारोपणाच्या नावाखालील कामे आणि टेकडीच्या अस्तित्वाशी संबंधित प्रश्नांवर आवाज उठविला जात आहे.

टेकडी बचाव कृती समितीचे निमंत्रक डॉ. दीपक देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाला दुजोरा देत आंदोलनाची तीव्रता व व्याप्ती वाढविण्यासोबतच न्यायालयाचेही लक्ष वेधणार असल्याचे सांगितले. नैसर्गिक टेकड्यांचे संवर्धन करणे आवश्यक असून, पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी टेकड्यांचे अनियंत्रित उत्खनन थांबविण्याची मागणी त्यांनी केली.

निष्क्रिय पदाधिकारी, बेजबाबदार अधिकारी आणि ठेकेदारांच्या संगनमताने टेकडीचे उत्खनन करून काँक्रिटीकरण सुरू असल्याचा आरोप पत्रकातून करण्यात आला आहे. टेकडीचा नैसर्गिक पाया उध्वस्त करून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींविरोधात लढा सुरूच ठेवण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, डॉ. दीपक देशमुख यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या चळवळीला शहरातील समविचारी नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. टेकडीच्या प्रश्नाबरोबरच विविध विकासकामांचा दर्जा आणि त्यावर झालेल्या खर्चाबाबतही नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; पाथर्डीत तिघांविरुद्ध गुन्हा

**● पाथर्डी । वीरभूमी–**




हुंड्यासाठी पैशांची मागणी करून मानसिक व शारीरिक त्रास दिल्याचा आरोप करीत एका विवाहितेने दिलेल्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिस ठाण्यात पतीसह सासू-सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनयना सोमिनाथ वाघमारे (वय ३०, सध्या रा. पाथर्डी) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, सुनयना यांचा विवाह छत्रपती संभाजीनगर येथील सोमिनाथ प्रल्हाद वाघमारे यांच्याशी झाला. सुरुवातीचा काही काळ संसार सुरळीत होता. मात्र, त्यानंतर मानपान व इतर कारणांवरून सासरच्या मंडळींकडून त्रास सुरू झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

पतीला दारूचे व्यसन असल्याचे समजल्यानंतर तो कामावर न जाता दारू पिऊन मारहाण व शिवीगाळ करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच माहेरहून हुंडा दिला नसल्याचे सांगून सासरच्या नातेवाईकांसमोर अपमान केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

गरोदरपणात झालेल्या मारहाण व मानसिक त्रासामुळे गर्भपात झाल्याचा आरोपही विवाहितेने केला आहे. त्यानंतर घर बांधण्यासाठी १० लाख रुपये आणण्याची मागणी करण्यात आली. मागणी पूर्ण न केल्यास मारहाण करून घराबाहेर काढल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

पती व सासरच्या मंडळींकडून वारंवार पैसे, सोने व वाहनाची मागणी होत असल्याचे विवाहितेने सांगितले. या प्रकरणात कुटुंबीय व नातेवाईकांच्या माध्यमातून समेटाचे प्रयत्न करण्यात आले; मात्र परिस्थितीत सुधारणा झाली नसल्याचे तिने पोलिसांना सांगितले.

दि. १८ मार्च २०२६ रोजी माहेरी आल्यानंतरही त्रास सुरूच राहिल्याने विवाहितेने पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून सोमिनाथ प्रल्हाद वाघमारे, प्रल्हाद बापूराव वाघमारे आणि निर्मला प्रल्हाद वाघमारे (सर्व रा. भाग्योदयनगर, सातारा परिसर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलिस करीत असून, फिर्यादीतील आरोपांची चौकशी सुरू आहे.

## मढेवडगावच्या विद्यार्थिनींच्या हातून सीमेवरील जवानांसाठी राख्या

**चार वर्षांपासून उपक्रम सुरू । रक्षाबंधनातून सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**




देशाच्या सीमेवर ऊन, वारा, पाऊस आणि प्रतिकूल परिस्थितीची पर्वा न करता अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मढेवडगाव येथे रक्षाबंधनाचा अनोखा आणि भावस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला. माजी सैनिक नवनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सैनिक संघटना मढेवडगाव आणि न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या चार वर्षांपासून विद्यार्थिनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या राख्या सीमेवरील सैनिक बांधवांना पाठवत आहेत.

रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नसून, देशाच्या संरक्षणासाठी सीमेवर उभ्या असलेल्या प्रत्येक सैनिकाशी आपले ऋणानुबंध दृढ करण्याचा दिवसही आहे, या भावनेतून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यंदाही शाळेतील विद्यार्थिनींनी उत्साहाने आकर्षक व कलात्मक राख्या तयार करून त्या देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांसाठी पाठविल्या.

‘सीमेवर सैनिक जागा म्हणून देशातील नागरिक सुरक्षित’ या भावनेतून विद्यार्थिनींनी राख्यांमधून सैनिकांप्रती प्रेम, आदर आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. सैनिकांमुळे आपण आपल्या कुटुंबीयांसोबत सण-उत्सव आनंदाने साजरे करू शकतो, त्यांच्या त्यागाची आणि शौर्याची जाणीव नव्या पिढीला व्हावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

गेल्या चार वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या या उपक्रमामुळे शाळा, विद्यार्थी आणि सैनिक यांच्यातील भावनिक नाते अधिक घट्ट होत असून, रक्षाबंधनाला देशभक्तीची अनोखी किनार लाभली आहे. विद्यार्थिनींच्या हातून तयार झालेली प्रत्येक राखी ही सीमेवरील जवानांसाठी केवळ धागा नसून, देशवासीयांच्या प्रेमाची आणि कृतज्ञतेची भावनिक साद ठरत आहे.

या उपक्रमासाठी मुख्याध्यापक हौसराव दांगडे, पर्यवेक्षक विलास सुलाखे, रामदास पवार, संतोष भोईटे, विकास चव्हाण, शंकर यडलोड, प्रणव नलगे तसेच मीनाक्षी कदम, सुजाता डाके आणि महादेवी माने यांचे सहकार्य लाभले.

## शिक्षकांनी वर्गणीतून उभारले माणिकदौंडी केंद्रात ‘कुसुमाग्रज वाचनालय’

**● पाथर्डी । वीरभूमी –**



शिक्षकांमध्ये वाचनाची आवड जोपासण्याबरोबरच सातत्याने ज्ञानवृद्धी आणि वैचारिक समृद्धी व्हावी, या उद्देशाने माणिकदौंडी बीटअंतर्गत केंद्र माणिकदौंडी येथील शिक्षकांनी एकत्रितपणे पुढाकार घेत ‘कुसुमाग्रज वाचनालय’ सुरू केले. स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर या वाचनालयाचा शुभारंभ करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रातील शिक्षकांनी स्वतःच्या वर्गणीतून हा उपक्रम साकारला आहे. सुरुवातीच्या टप्प्यात वाचनालयात विविध विषयांवरील सुमारे २०० दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे अध्यापनासोबत साहित्य, समाज, इतिहास, संस्कृती, विज्ञान तसेच विविध ज्ञानशाखांचे वाचन करण्यासाठी शिक्षकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी केंद्रातील प्रत्येक शिक्षकाने वाचनालयातील एक पुस्तक निवडून प्रत्यक्ष वाचनास सुरुवात केली. त्यामुळे ‘वाचनालय सुरू झाले’ इतक्यापुरता हा उपक्रम मर्यादित न राहता ‘वाचनातून ज्ञान आणि ज्ञानातून गुणवत्तापूर्ण शिक्षण’ या संकल्पनेला कृतीची जोड मिळाली.

वाचनालयाचा उद्घाटन सोहळा माजी पंचायत समिती सदस्य विष्णुपंत पवार आणि शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजी कराड यांच्या हस्ते उत्साहात झाला. यावेळी समूह साधन केंद्र समन्वयक विठ्ठल शिंदे, नागनाथ हलकम्बे यांच्यासह माणिकदौंडी केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

### शिक्षकांच्या वाचनातून विद्यार्थ्यांनाही प्रेरणा

■ शिक्षकांच्या वाचनातून विचारांची देवाणघेवाण वाढावी, नवनवीन ज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्हावा, या व्यापक उद्देशाने सुरू करण्यात आलेले ‘कुसुमाग्रज वाचनालय’ कौतुकास्पद आहे. शिक्षकांनी उचललेले हे पाऊल विद्यार्थ्यांमध्येही वाचन संस्कृती रुजविण्यास प्रेरणादायी ठरेल, असे शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव कराड यांनी सांगितले.

# पारनेर शहरातील रस्ता २२ मीटरचा करण्याची मागणी

**स्वाक्षरी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद । वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नागरिक एकवटले**

**● पारनेर । वीरभूमी–**



पारनेर शहरातून जाणाऱ्या प्रमुख रस्त्याची रुंदी २२ मीटर करण्यात यावी, अशी एकमुखी मागणी शहरवासीयांनी केली आहे. या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे.

पारनेर शहराची वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि वाढती वर्दळ लक्षात घेता सध्याचा रस्ता अपुरा पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अरुंद रस्त्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असून, पादचारी, दुचाकीस्वार आणि वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहराच्या भविष्यातील विकासाचा विचार करता रस्त्याचे रुंदीकरण आताच व्यापक स्वरूपात करणे आवश्यक असल्याची भूमिका नागरिकांनी मांडली.

रस्ता २२ मीटरचा झाल्यास वाहतूक सुरळीत होण्याबरोबरच शहरातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होईल. व्यापारी, विद्यार्थी, नागरिक तसेच बाहेरून येणाऱ्या वाहनचालकांना त्याचा फायदा होणार आहे. त्यामुळे रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून शहराच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले.

स्वाक्षरी मोहिमेला शहरातील विविध भागांतील नागरिक, व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जमा होणाऱ्या स्वाक्षऱ्या संबंधित प्रशासनाकडे सादर करण्यात येणार आहेत.

शासन व प्रशासनाने नागरिकांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून रस्त्याची मोजणी, आवश्यक भूसंपादन आणि रुंदीकरणाची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी अपेक्षा शहरवासीयांनी व्यक्त केली आहे. पारनेरच्या भविष्यातील विकासासाठी २२ मीटरचा रस्ता अत्यावश्यक असून, यासाठी एकत्रितपणे पाठपुरावा करण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.

# निघोज-टाकळी हाजी परिसरातील मंदिरांत चोरी

## तीन मंदिरांतील दानपेट्या फोडल्या । मळगंगा मंदिरातून ५४ हजारांचा ऐवज चोरी


**● निघोज । वीरभूमी-**

पारनेर तालुक्यातील निघोज, वडगाव गुंड तसेच शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील मळगंगा मंदिरांत चोरट्यांनी दानपेट्या फोडून चोरी केली. मळगंगा मंदिरातून सुमारे ५० हजार रुपये रोख व चांदीचे दागिने असा एकूण ५४ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची फिर्याद मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर यांनी पारनेर पोलिसांकडे दिली आहे.

वडगाव गुंड येथील भैरवनाथ मंदिरातील दानपेटी फोडून सुमारे दीड ते दोन हजार रुपये चोरल्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली. त्यानंतर टाकळी हाजी येथील मळगंगा मंदिरातील दानपेटी फोडण्यात आली. या दानपेटीतील रक्कम अनेक दिवसांपासून काढण्यात आली नसल्याने मोठी रक्कम चोरीला गेल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

त्यानंतर मध्यरात्री दोन ते तीनच्या सुमारास निघोज हद्दीतील मळगंगा मंदिरात चोरट्यांनी प्रवेश केला. सीसीटीव्हीमध्ये पाच चोरटे दिसत आहेत. प्रथम त्यांनी गाभाऱ्याचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यात अपयश आले. मंदिरात झोपलेल्या अतुल उद्धव कारकुड यांना जागे करून चोरट्यांनी किल्लीची मागणी केली. किल्ली नसल्याचे सांगितल्यानंतर त्यांची झडती घेऊन गप्प झोप, अन्यथा मारून टाकण्याची धमकी दिल्याचे कारकुड यांनी सांगितले.

त्यानंतर चोरट्यांनी गाभाऱ्याचा दरवाजा तोडून दानपेटी फोडली. त्यात सुमारे ५० हजार रुपये असल्याची शक्यता आहे. मंदिरातील चार दानपेट्यांपैकी गाभाऱ्यातील एक व आवारातील एक दानपेटी फोडण्यात आली, तर अन्य दोन दानपेट्या फोडण्याचा प्रयत्न झाला. चोरटे तब्बल तासभर मंदिर परिसरात असल्याचे सीसीटीव्हीमधून दिसून येत आहे.







दरम्यान, मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास चोरीची माहिती मिळताच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी निघोज पोलिसांशी संपर्क साधला. पारनेरचे पोलिस निरीक्षक खेडेकर यांनी घटनास्थळी पाहणी केली. श्वानपथकाने निघोजच्या दिशेने असलेल्या कमानीपर्यंत माग काढला. नगरहून ठसेतज्ज्ञही दाखल झाले असून त्यांच्या अहवालानंतर तपासाची दिशा निश्चित होणार आहे.

टाकळी हाजी येथील मळगंगा मंदिरात गाभाऱ्याचा दरवाजा न तोडता बनावट चावीने कुलूप उघडण्यात आले. दानपेटीतील रक्कम घेऊन कुलूप पुन्हा लावण्यात आले. त्यामुळे चोरटे सराईत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या तिन्ही मंदिरांत यापूर्वीही चोरी झाली असून, पुन्हा चोरी झाल्याने पारनेर पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात मोठी वर्दळ असूनही मंदिर परिसरात पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याची तक्रार भाविक व ग्रामस्थांनी केली आहे. मंदिराच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी सशस्त्र रखवालदार नेमण्याची मागणी करण्यात आली आहे.

### सीसीटीव्हीत चोरटे 'पाया पडताना' दिसले

■ मंदिरात चोरी करताना चोरटे देवासमोर पाया पडत असल्याचे सीसीटीव्हीमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. या देवस्थानाची माहिती घेऊनच चोरी करण्यात आली असावी, असा संशय व्यक्त होत असून, चोरट्यांना मंदिराची अंतर्गत माहिती कोणी पुरवली का, याचा तपास करणे पोलिसांसमोर महत्त्वाचे आव्हान आहे.

चोरीच्या घटनांचा तातडीने तपास करून चोरट्यांना अटक करावी, अन्यथा भाविक रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. स्थानिकांचा सहभाग आहे का, याचाही तपास पोलिसांनी करावा, अशी मागणी होत आहे.

# आदिवासींनी संस्कृतीचे जतन करावे : लहानगे

## वांजुळशेत येथे विद्यार्थी गुणगौरव व शैक्षणिक साहित्य वाटप

**● अकोले । वीरभूमी-**

आदिवासी विद्यार्थ्यांनी शिक्षणावर लक्ष केंद्रित करून शैक्षणिक ध्येय निश्चित करावे. त्याचबरोबर आपली संस्कृती आणि बोलीभाषेचे जतन करण्याची जबाबदारीही स्वीकारावी. आदिवासींच्या बोलीतील अनेक शब्द व भाषा कृत्रिम बुद्धिमत्तेलाही (एआय) ज्ञात नाहीत; ते जगाला सांगण्याचे काम आपणच करू शकतो, असे प्रतिपादन नवनाथ लहानगे यांनी केले.

वांजुळशेत (ता. अकोले) येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी क्रांती दलाच्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रचना व कार्यपद्धती अधिकारी देवराम पडवळे होते.



दहावीच्या परीक्षेत यश मिळविणाऱ्या अक्षदा तुकाराम पडवळे (प्रथम), आश्विनी भिमा वाळेकर (द्वितीय), माया दीपक लोहकरे (तृतीय) तसेच बारावीतील चारुशीला अशोक लोहकरे (प्रथम), आरती चंद्रभान वाळेकर (द्वितीय), सोमनाथ निवृत्ती वाळेकर (तृतीय) यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविणारे सिद्धेश नामदेव पडवळे व साहिल सुधाकर बर्वे तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उपजिल्हाधिकारीपदी निवड झालेल्या प्रिती बाजीराव वाळेकर यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी गावातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांना ललिता दीपक डोळस (तांबेकर), मुंबईकर व ग्रामस्थांच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीबाबत ग्रामस्थांनीही जागरूक भूमिका घेऊन त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय वाळेकर यांनी केले. सूत्रसंचालन सुनील मेचकर यांनी केले, तर आभार नारायण कोडार यांनी मानले. कार्यक्रमास नामदेव लोहकरे, दुंदा पडवळे, काशिनाथ वाळेकर, खंडू इरनक, पुनाजी तांबेकर, दुंदा लोहकरे, पांडुरंग लोहकरे, गोविंदा लोहकरे, लहानु देठे, दगडू वाळेकर, राजेंद्र लोहकरे, रोहिदास शेंगाळ, रामनाथ लोहकरे, शांताराम पडवळे, विश्वनाथ लोहकरे, अरुण वाळेकर, भास्कर वाळेकर, गणेश चिखले, भरत लोहकरे, प्रकाश लोहकरे, ऋषिकेश तांबेकर, तुकाराम कोंडार, ज्ञानेश्वर तांबेकर, आकाश पडवळे, ज्ञानेश्वर वाळेकर, सचिन पडवळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी स्वतःची सृजनशीलता जागृत ठेवत 'स्क्रीन टाईम' कमी करून 'ग्रीन टाईम' वाढवा

## डॉ. प्रशांत साठे । स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन

**● पाथर्डी । वीरभूमी-**

विद्यार्थ्यांनो मोबाईलचा अतिवापर टाळून स्वतःची सृजनशीलता जागृत ठेवा. स्क्रीन टाईम कमी करून खेळ, व्यायाम, वाचन, लेखन आणि विविध छंदांना वेळ द्या, असे आवाहन पुणे येथील बी.एम.सी.सी. कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. प्रशांत साठे यांनी केले.



सहकार महर्षी स्व. दादापाटील राजळे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त आदिनाथनगर येथील दादापाटील राजळे महाविद्यालयात आयोजित स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी 'स्क्रीन टाईम ते ग्रीन टाईम' या विषयावर ते बोलत होते. गुरुवार, दि. २० ते शनिवार, दि. २२ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या या व्याख्यानमालेचे हे २१ वे वर्ष आहे.

डॉ. प्रशांत साठे म्हणाले, सोशल मीडियावर माहितीचा लोंढा वाढत असून, त्यातून योग्य माहिती व विचार निवडण्याची क्षमता विद्यार्थ्यांनी विकसित करावी. संपर्क, संवाद आणि समन्वय महत्त्वाचे आहेत. प्रत्येकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे हीच राष्ट्रसेवा आहे. आपले मन हेच आपले सीसीटीव्ही कॅमेरा आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला.

मोबाईलच्या अतिवापरामुळे व्यसनाधीनता, झोपेचा अभाव, मानसिक अस्वास्थ्य आणि अति माहितीचे दुष्परिणाम होऊ शकतात. विकसित भारत घडवायचा असेल तर मोबाईलचा अतिवापर टाळणे गरजेचे आहे, असे डॉ. साठे यांनी सांगितले. एकदा कमी गुण मिळाले तरी चालतील; मात्र व्यसनाच्या वाटेवर कधीही जाऊ नका, असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी बैठे व मैदानी खेळ, व्यायाम, वाचन, लेखन, छंद आणि सायकलिंग यांसारख्या उपक्रमांना वेळ द्यावा. आपल्याकडे असलेल्या विविध कलांपैकी एखाद्या कलेत प्रावीण्य मिळविण्याचा प्रयत्न विद्यार्थी दशेतच करावा. तसेच पसायदान आणि प्रतिज्ञेतील मूल्ये जीवनात आचरणात आणावीत, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार मोनिका राजळे होत्या. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करून स्वतःबरोबरच समाजाचेही हित साधावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाच्या 'वृद्धेश्वर' वार्षिक नियतकालिकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र इंगळे व डॉ. किशोरकुमार गायकवाड यांनी केले तर डॉ. गंगाधर लवांडे यांनी आभार मानले.

यावेळी वृद्धेश्वरचे ज्येष्ठ संचालक उद्धवराव वाघ, अरविंद पारगावकर, राहुलदादा राजळे, व्हा. चेअरमन बाबासाहेब किलबिले, रामकिसन काकडे, संदीप लोखंडे, शेषराव कचरे, बाळासाहेब अकोलकर, श्रीकांत मिसाळ, भगवानराव साठे, सुभाषराव बुधवंत, सुरेश नेमाने, भास्करराव गोरे, आर. जे. महाजन, पोपटराव आंधळे, बी. आर. लवांडे, वसंतराव नेहुल, सचिन वायकर, अश्पाक शेख, सुनील पुंड यांच्यासह पालक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाथर्डीच्या बैल बाजारात तीन लाखांची खिलार जोडी

## यंत्रयुगातही बैलांवरील शेतकऱ्यांचे प्रेम कायम । बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर बाजारात तेजी

**● पाथर्डी । वीरभूमी-**

आधुनिक शेतीत यंत्रांचा वापर वाढला असला, तरी शेतकऱ्यांचे बैलांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते आजही कायम आहे. आगामी बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी येथील बैल बाजारात बैलजोड्यांची मागणी वाढली असून, बाजारात आर्थिक उलाढालही वाढली आहे. विशेषतः देखण्या, मजबूत आणि उच्च प्रतीच्या खिलार बैलांना शेतकऱ्यांकडून मोठी पसंती मिळत आहे.

मागील आठवड्यात अहिल्यानगर येथील शेतकरी तथा नगरसेवक किशोर डागवले यांनी कर्नाटकातून आणलेली उच्च प्रतीची खिलार बैलजोडी तब्बल तीन लाख ११ हजार रुपयांना खरेदी केली. गुणवडी (ता. नगर) येथील अशोक शेळके यांनीही अशाच प्रकारची बैलजोडी खरेदी केल्याची माहिती विक्रेते गणेश दराडे यांनी दिली.



बैलजोडीचा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर शेतकरी व बैलप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. बैलांना सजवून, फटाके फोडत, गुलालाची उधळण करत आणि डीजेच्या निनादात मिरवणूक काढण्यात आली. त्यामुळे पारंपरिक बैलपोळा संस्कृती आणि आधुनिक काळाचा अनोखा संगम पाहायला मिळाला.

बैलपोळा हा केवळ सण नसून शेतकरी आणि बैल यांच्यातील भावनिक नात्याचा उत्सव मानला जातो. वर्षभर शेतीकामात साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची परंपरा ग्रामीण भागात आजही उत्साहाने जपली जाते. त्यामुळे पोळा जवळ येताच चांगल्या बैलजोड्यांना मागणी वाढते. यंदाही खिलार, देशी तसेच मजबूत व देखण्या बैलांना चांगला भाव मिळत आहे.

बैलांची उंची, बांधा, रंग, शिंगांची ठेवण, चालण्याची ढब आणि शेतीकामाची क्षमता यांचा विचार करून शेतकरी बैलांची निवड करत असल्याचे दिसून येत आहे. तीन लाखांहून अधिक किमतीच्या खिलार जोडीच्या व्यवहारामुळे पाथर्डीच्या बाजारात विशेष चर्चा रंगली.

या प्रसंगी खरेदीदार किशोर डागवले तसेच विक्रेते गणेश दराडे यांचा उपस्थितांच्या वतीने सन्मान करण्यात आला. नगरसेवक प्रतीक खेडकर यांच्यासह बैलप्रेमी, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर पाथर्डीचा बैल बाजार पुन्हा गजबजला असून, आगामी दिवसांत बैलजोड्यांच्या व्यवहारात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. यंत्रयुगातही शेतकऱ्यांच्या मनातील बैलांबद्दलचा जिव्हाळा आणि पारंपरिक शेती संस्कृतीशी असलेली नाळ कायम असल्याचे या व्यवहारातून अधोरेखित झाले.

# 'इंडिया अगेंस्ट कुमन धारणालय' अभियानाची २८ ऑगस्टला घोषणा

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

समाजातील स्वार्थ, जातीय विषमता, धार्मिक द्वेष आणि हिंसक प्रवृत्तींना वैचारिक पातळीवर आव्हान देण्यासाठी 'इंडिया अगेंस्ट कुमन धारणालय' या देशव्यापी मोहिमेची घोषणा शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणार आहे.

पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट व्यक्तीविरोध नसून, समाजात खोलवर रुजलेल्या विघातक मानसिक प्रवृत्तींना वैचारिक आव्हान देऊन त्यामध्ये परिवर्तन घडविणे हे आहे. आयोजकांच्या मते, 'कुमन' हा शब्द कोणत्याही धर्म, जात किंवा समुदायाविरुद्ध नसून तीन प्रकारच्या विघातक मनोवृत्तींचे प्रतीक आहे. यामध्ये 'कु' म्हणजे कुरु, कौरव, स्वार्थी प्रवृत्ती सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा केवळ स्वतःकडे किंवा संकुचित गटाकडे केंद्रित करण्याची मानसिकता; 'म' म्हणजे मनुवादी प्रवृत्ती जन्माच्या आधारावर उच्च-नीच सामाजिक व्यवस्था आणि विषमता टिकवून ठेवण्याची मानसिकता; तर 'न' म्हणजे नथूराम, द्वेषमूलक व हिंसक प्रवृत्ती संवाद, लोकशाही आणि अहिंसेऐवजी द्वेष व हिंसेकडे झुकणारी मानसिकता, अशी मांडणी करण्यात आली आहे.

या आंदोलनात 'धारणालय' हा शब्द व्यक्तीच्या मनात दीर्घकाळ साठलेल्या संस्कार, अनुभव, श्रद्धा, पूर्वग्रह आणि सामाजिक धारणा यांच्या संचयासाठी वापरण्यात आला आहे. याला सकारात्मक पर्याय म्हणून 'पसायदान धारणालय' ही संकल्पना पुढे करण्यात आली आहे. समता, बंधुता, अहिंसा, लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संविधानिक नैतिकता, निसर्गप्रेम आणि कायद्याचे राज्य या मूल्यांवर आधारित वैयक्तिक व सामूहिक परिवर्तन घडविणे, हा त्यामागील उद्देश आहे.